रे.के.नं. ७८/२०१८
नि.क्र.६१/क

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.२ याची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | रवि रामया थेवर |
| वय | - | ६३ वर्षे |
| व्यवसाय | - | टायपिंग सेंटर |
| राहणार | - | धारावी |

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती पवार यांच्याद्वारे**

१. घटनेसंबंधी मला पोलीसांनी बोलाविले होते. मला त्याची तारीख आठवत नाही. घटनेच्या वेळी मी टायपिंग सेंटर चेच काम करीत होतो. माझे कार्यालय मज्ीद बंदर वेस्ट येथे आहे. घटना काय घडली होती ते मला माहित नाही. पोलीसांनी माझेकडे विचारपूस केली होती. पोलीसांनी माझेकडे एक कागद घेऊन येऊन तो टायपिंग करुन दिला का याबाबत विचारणा केली होती. पोलीसांनी माझे कम्प्युटर मधील हार्डडीस्क नेली होती. ती हार्डडीस्क कोणासंबंधी नेली याबाबत मला माहिती नाही. ती हार्डडीस्क मला दाखविल्यास मी ओळखू शकत नाही.

**साक्षीदार अभियोग पक्षास पुर्णपणे सहकार्य करीत नसल्याने त्याला सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी सरकारी वकीलांनी मागितली. करीता परवानगी देण्यात येत आहे.**

२. मी गिरीश ठाकूर याला ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी गिरीश ठाकूर याला मागील २० वर्षापासून ओळखतो. हे मला माहित नाही की, तो क्लीअरींग व फॉरवर्डींग एजंट म्हणून काम करतो. हे मला माहित नाही की, तो न्हावाशेवा पोर्ट येथे इनपोर्ट एक्सपोर्टचे काम करतो. हे म्हणणे खरे आहे की, तो माझे कडून कागदपत्रे टाईप करुन घेऊन जात असे. हे म्हणणे खरे नाही की, गिरीश व

त्याच्या साथीदारांनी माझ्याकडून प्रमाणपत्र टाईप करुन घेतले होते. हे म्हणणे खरे आहे की, कागदावर मजकूर लिहून घेतला होता. आता मला मुद्देमाल क्र. ९/२०२५ वरील सिलबंद असलेली दोन पाकीट न्यायालयासमक्ष त्याचे सिल काढून दाखविले. त्यातील एका पाकीटामध्ये एचपी कंपनीची ७००एमबीची सीडी व दुसऱ्या पाकीटामध्ये एक हार्डडिस्क मिळून आली. आता मला दाखविलेली हार्ड डिस्क ही माझे कम्प्युटर मधीलच जप्त केलेली आहे किंवा नाही ते मला सांगता येत नाही. तसेच सीडी माझेकडून जप्त केली नव्हती. **सदर हार्डडीस्क न्यायालयात संगणकास जोडून त्यातील मजकूर पाहण्याचा प्रयत्न केला असता, त्यासाठीची योग्य साधन न्यायालयात उपलब्ध नसल्याने त्यातील मजकूर पाहता आला नाही.** आरोपी गिरीश याला पाहिल्यास मी ओळखू शकतो. तो आजरोजी न्यायालयात हजर आहे.

**<u>उलटतपास आरोपींतर्फे वकील श्री. योगेश गांगण यांच्याद्वारे...</u>**

३. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझा कधीही जबाब घेतला नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझ्या दुकानात येऊन कधीही पंचनामा केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, कागदावर काय मजकूर लिहून घेतला होता याची मला वैयक्तीक माहिती नाही.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

सही/-

उरण, (एस.पी. वानखडे )

दिनांक – २५/११/२०२५ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग,न्यायालय क्र.२ उरण